# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१८

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

### खासगी उद्योगासाठी भूसंपादन करताना असलेली अट शासकीय भूसंपादनासाठीसुद्धा लागू करण्याबाबत

**(१) ८६०८ (०७-०४-२०१५). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहराची २०२५ साली अमुक लोकसंख्या असेल असे गृहीत धरुन तेव्हाची गरज मागवण्यासाठी ठाणे, रायगड आणि पालघर जिल्ह्यांमध्ये १२ धरणे प्रस्तावित केली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नवीन भूसंपादन कायदयात खासगी उद्योगासाठी भूसंपादन करताना ग्रामसभेतील ८०% लोकांची संमती अनिवार्य म्हटली आहे हीच अट शासकीय भूसंपादनासाठी लागू करण्याची मागणी प्रकल्पग्रस्तांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार प्रकल्पग्रस्तांची मागणी पुर्ण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२२-०२-२०१८) :** (१) होय.

मुंबई शहराच्या पिण्याच्या पाणीपुरवठ्यासाठी पालघर जिल्ह्यात खरगिहील, पिंजाळ व गारगाई हे ३ प्रकल्प प्रस्तावित आहेत. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणासाठी ठाणे जिल्ह्यात काळू व शाई हे प्रकल्प प्रस्तावित आहेत. पालघर जिल्ह्यातील वसई विरार महानगरपालिकेसाठी देहरजी आणि वसई विरार उपप्रदेशासाठी सुसरी हे २ प्रकल्प प्रस्तावित आहेत. रायगड जिल्ह्यात सिडको प्राधिकरणासाठी कोंढाणे व बाळगंगा हे प्रकल्प नियोजित असून पनवेल महानगरपालिकेसाठी गाढी प्रकल्प प्रस्तावित आहे. वरील प्रकल्पाशिवाय पोशिर, शिलार, हे दोन प्रकल्पही प्रस्तावित आहेत.

(२) उपरोक्त १२ प्रकल्प मुं.म.प्र.वि.प्रा. क्षेत्रातील लोकसंख्येस पिण्याच्या पाणीपुरवठा करिता प्रस्तावित असल्याने प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सांगली जिल्ह्यातील ताकारी व टेंभू उपसा सिंचन योजनेच्या पाणीपट्टी आकारणी दरामध्ये करण्यात आलेली दरवाढ

**(२) ४८५४५ (२९-०४-२०१६). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सांगली जिल्ह्यातील ताकारी व टेंभू उपसा सिंचन योजनेच्या पाणीपट्टी आकारणी दरामध्ये करण्यात येणाऱ्या दरवाढीबाबत फेरविचार करण्याची विनंती पाणी वापर सिंचन संस्थेच्या अध्यक्षांनी मा.मुख्यमंत्री, मा.जलसंपदा मंत्री, जिल्हाधिकारी, सांगली, सिंचन विभागाचे संबंधित अधिकारी यांच्याकडे माहे नोव्हेंबर-डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२३-०२-२०१८) :**(१) हे खरे नाही.
कार्यकारी संचालक, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे यांना श्री.पी.ए.पाटील, बारमाही माणगंगा अभ्यास पथक, आटपाडी रा.आटपाडी यांनी “टेंभू उपसा सिंचन योजना आटपाडी सांगोला तालुका पाणी पुरवठा व वीज बील इ. बाबत” विषयाचे दि.१५.१०.२०१५ रोजी निवेदन दिले आहे. सदर निवेदनात ताकारी व टेंभू उपसा सिंचन योजनेच्या पाणीपट्टी आकारणी दरामध्ये करण्यात येणाऱ्या दरवाढीबाबतचा उल्लेख आढळून येत नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## गोंदिया येथील प्रताप मेमोरियल चॅरीटेबल ट्रस्टने स्वर्ण जयंती स्वरोजगार योजनेच्या प्राप्त झालेल्या निधीचा अपहार केल्याबाबत

**(३) ६४४६९ (२३-०८-२०१६). श्री.चरण वाघमारे (तुमसर), श्री.विजय रहांगडाले (तिरोडा), श्री.राजेश काशीवार (साकोली) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदिया येथील प्रताप मेमोरियल चॅरीटेबल ट्रस्ट व जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, गोंदिया यांनी स्वर्ण जयंती स्वरोजगार योजनेच्या प्राप्त झालेल्या निधीचा अपहार केल्या प्रकरणी चौकशीची करण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी दिनांक ९ मार्च, २०१६ रोजी वा त्या सुमारास मा.मुख्यमंत्री यांचेकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२१-०२-२०१८) :** (१) होय.
(२) सदर प्रकरणाच्या अनुषंगाने यापूर्वी करण्यात आलेल्या चौकशी बाबतची वस्तुस्थिती मा.मुख्यमंत्री महोदय यांचेकडे सादर करण्यात आलेली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नांदगांव (जि.नाशिक) तालुक्यातील लघुपाटबंधारे योजना मांडवडवाडी (लक्ष्मीनगर) या योजनेचे व कालव्याचे काम मालेगाव पाटबंधारे विभागाकडे हस्तांतरित करण्याबाबत**

**(४) ६७६६७ (२२-०१-२०१७). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदगांव (जि.नाशिक) तालुक्यातील लघुपाटबंधारे योजना मांडवडवाडी (लक्ष्मीनगर) या योजनेचे व कालव्याचे काम सन २००४-०५ मध्ये लघुसिंचन (जलसंधारण) उपविभाग मालेगाव या कार्यालयामार्फत पूर्ण करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त लघुपाटबंधारे तलावाचा कालवा मालेगाव पाटबंधारे विभाग मालेगाव या विभागाकडे हस्तांतरित करण्यात आला नसल्याने या कालव्याची दुरुस्ती करण्यात येत नाही त्यामुळे शेतकरी शेती सिंचनापासून वंचित रहात आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कालवा हस्तांतरित न होण्याबाबतची कारणे काय आहेत,
(४) असल्यास,उपरोक्त लघुपाटबंधारे तलावाचा कालवा हस्तांतरित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०५-०३-२०१८) :** (१) मांडवडवाडी या लघु पाटबंधारे योजनेच्या धरणाचे काम मे, १९९० मध्ये लघु पाटबंधारे विभाग, मालेगाव या जलसंपदा विभागाच्या कार्यालयामार्फत तर कालव्याचे काम सन २००४-२००५ मध्ये लघु सिंचन (जलसंधारण), विभाग या जलसंधारण विभागाच्या कार्यालयामार्फत पूर्ण करण्यात आले आहे.
(२) मालेगाव पाटबंधारे विभाग, मालेगाव या विभागाकडे जलसंधारण विभागाकडून कालवा हस्तांतरीत करण्यात आलेला नाही. हे खरे आहे. मात्र मालेगाव पाटबंधारे विभाग, मालेगाव यांचेकडून नदीद्वारा पाणी सोडून शेतीसाठी पाणी पुरवठा करण्यात येत आहे. त्यामुळे शेती सिंचनापासून वंचित नाही.

(३) व (४) दिनांक २१.०४.२००१ चा शासन निर्णय व दिनांक २९.०३.२००३ च्या शासन पत्रानुसार बांधकाम यंत्रणा कार्यकारी अभियंता, लघु सिंचन, जलसंधारण विभाग, नाशिक यांनी प्रकल्पावरील कालवे व बांधकामे शासनाचे प्रचलित नियमानुसार व विहित पद्धतीनुसार जलसंपदा विभागाकडे हस्तांतरीत केलेली नाहीत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वसई (जि.पालघर) तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या सुमारे १७ शाळांच्या इमारतीची झालेली दुरवस्था

**(५) ६७८५३ (२७-०१-२०१७). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वसई (जि.ठाणे) तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या सुमारे १७ शाळांच्या इमारती धोकादायक असल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या शाळांचे स्ट्रक्चरल ऑडिट करुन या धोकादायक इमारतीतील विद्यार्थ्यांना पर्यायी जागा उपलब्ध करुन देण्याबाबत व उक्त १७ शाळांच्या इमारतींची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२०-०२-२०१८) :** (१) व (२) हे अंशतः खरे आहे.
वसई तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या ९ शाळांच्या इमारती धोकादायक असल्यामुळे जिल्हा परिषद शाळांच्या इमारती निर्लेखन तसेच, स्ट्रक्चरल ऑडिट करण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच, जिल्हा नियोजन समिती, पालघर यांनी शाळा दुरुस्तीसाठी सन २०१७-१८ करीता रु.५२५.०० लक्ष निधी मंजूर केला असून वसई तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या ४५ शाळांच्या दुरुस्तीच्या कामाची अंदाजपत्रके तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वसई (जि.पालघर) तालुक्यातील जिल्हापरिषद शाळांची झालेली दुरवस्था

**(६) ६८९९० (२७-०१-२०१७). श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.सुरेश लाड (कर्जत) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वसई (जि. पालघर) तालुक्यातील जिल्हापरिषद शाळांची दुरवस्था झाली असल्याचे माहे सप्टेंबर २०१६ च्या तिसऱ्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) तसेच नालासोपारा (पश्चिम) सख्खर मोहल्ला येथील शाळेचा चार वर्षापासून वीज पुरवठा खंडीत करण्यात आला, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास, तद्नुसार वसई तालुक्यातील जिल्हापरिषद शाळांची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२७-०२-२०१८) :** (१) हे अंशतः खरे आहे.

वसई तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या ९ शाळांच्या इमारती धोकादायक आहेत. सदर शाळांच्या इमारती निर्लेखन करण्याची कार्यवाही सुरु आहे. जिल्हा परिषद शाळांचे स्ट्रक्चरल ऑडिट करुन वसई तालुक्यात ४५ शाळा विशेष दुरुस्ती करण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.
(२) हे खरे नाही.

सद्य:स्थितीत विजपुरवठा नियमित सुरु आहे.
(३) व (४) वसई तालुक्यातील जिल्हा परिषद शाळांना जिल्हा नियोजन समिती पालघर यांनी सन २०१७-१८ करीता रु.५२५.०० लक्ष निधी मंजूर असून वसई तालुक्यातील जिल्हा परिषद ४५ शाळांच्या दुरुस्तीच्या कामाची अंदाजपत्रके तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौ.भराड (ता.डहाणू, जि.पालघर) येथील जिल्हा परिषदेच्या**
**शाळेच्या इमारतीची झालेली दुरवस्था**

**(७) ७८३६२ (१५-०४-२०१७). श्री.अमित घोडा (पालघर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौ.भराड (ता.डहाणू, जि.पालघर) येथे सन १९७१ मध्ये बांधलेल्या जिल्हा परिषदेच्या शाळेच्या इमारतीची अदयापपर्यंत दुरुस्ती झाली नसल्यामुळे इमारतीचे लाकडी वासे वाकलेले असून छताचे पत्रे तुटलेले आहेत, शाळेला संरक्षण भिंतही नाही तसेच शाळेत पावसाळयात गळती होत असल्याने विद्यार्थ्यांना गळती होत असलेल्या वर्गात बसावे लागत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शाळेच्या इमारतीच्या दुरुस्तीबाबत सन २०१४ पासून शाळा व्यवस्थापक समिती तसेच पंचायत समिती शिक्षण विभाग डहाणू,यांनी जि.प पालघर यांचेकडे वारंवार तक्रारी करुनही कोणतीही कार्यवाही केलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी केली आहे काय व त्यानुसार शाळेची दुरुस्ती व शाळेला संरक्षक भिंत बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२७-०२-२०१८) :** (१) हे अंशतः खरे आहे.

मौजे. भराडी, ता.डहाणू, जि.पालघर येथील जिल्हा परिषद शाळेत इयता १ ली ते ८ वी पर्यंतचे वर्ग असून ७ वर्ग खोल्या आहेत. त्यापैकी ५ वर्ग खोल्या सुस्थितीत आहेत. केवळ २ वर्ग खोल्यांच्या दुरुस्तीसाठी रु.४,०३,४८१/- इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

(२) हे खरे नाही.
(३) शाळेच्या इमारतीची दुरुस्ती करण्याबाबत कार्यवाही सुरु असून शाळेच्या संरक्षक भिंतीचे बांधकाम करण्यास निधी उपलब्ध नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नांदेड जिल्हयातील, पंचायत समिती, मुखेड अतंर्गत मागास भाग अनुदान योजनेच्या निधीत झालेला अपहार

**(८) ७९८३९ (१९-०४-२०१७). श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदेड जिल्हयातील पंचायत समिती, मुखेड अंतर्गत सन २०११ ते २०१३ या वर्षामधील मागासक्षेत्र अनुदान निधी प्रकल्पांतर्गत प्राप्त झालेल्या निधीतून कामे न करताच असंख्य ग्रामसेवक व गटविकास अधिकारी यांच्या संगनमताने कोटयवधी रूपयाचा अपहार झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आले,
(३) असल्यास, त्यानुसार दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२१-०२-२०१८) :** (१) नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील ग्रामसेवकांनी आपल्या विविध मागण्यासाठी केलेल्या आंदोलनाबाबत

**(९) ८२२३८ (२०-०४-२०१७). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील ग्रामसेवकांनी आपल्या विविध मागण्यासाठी दिनांक ७ नोव्हेंबर,२०१६ रोजी वा त्यासुमारास राज्यभर आंदोलन करण्यात आले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील ग्रामसवेकांच्या विविध मागण्या मान्य करण्याकरीता स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.ग्रामविकास मंत्री यांना दिनांक १७ नोव्हेंबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर निवेदनानुसार राज्यातील ग्रामसेवकांच्या मागण्या मान्य करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२६-०२-२०१८) :** (१) होय.

(२) होय.

(३) व (४) कंत्राटी ग्रामसेवकांनी ३ वर्षाचा व्यतित केलेला कंत्राटी कालावधी हा कालबध्द पदोन्नतीसाठी ग्राहय धरण्यास मान्यता मिळण्याबाबतचा प्रस्ताव मंजूरीसाठी अंतिम मान्यतेसाठी मंत्रिमंडळासमोर ठेवण्यात येणार आहे.

ग्रामसेवकांचा सुधारित जॉब चार्ट तयार करुन तो दिनांक ०३ डिसेंबर, २०१६ च्या परिपत्रकांन्वये निर्गमित करण्यात आलेला आहे.

उर्वरित मागण्यांवर निर्णय घेण्याकरिता शासनातर्फे सकारात्मक विचार सुरु आहे.

---

## शाहुवाडी (जि.कोल्हापूर) तालुक्यातील प्रकल्प पूर्ण करण्याबाबत

**(१०) ८५९३२ (२१-०८-२०१७). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शाहुवाडी (जि.कोल्हापूर) तालुक्यात दरवर्षी मुसळधार पाउस पडत असला तरी पाणी साठवणूक करण्यासाठी काही मोजकेच प्रकल्प असल्याने पाणी साठवणूक मुबलक प्रमाणात होत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त तालुक्यात अनेक प्रकल्प अपूर्ण असल्यामुळे नागरिकांना पाणीटंचाईच्या परिस्थितीला सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार अपूर्ण असलेले प्रकल्प पूर्ण करून पाणीटंचाईची समस्या सोडविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२१-०२-२०१८) :** (१) हे खरे नाही.

शाहूवाडी तालुक्यात २ मध्यम, ८ ल.पा. प्रकल्प व १ को.प.बंधारा नियोजित आहे. पैकी सोनुर्ले ल.पा. प्रकल्प वगळता २ मध्यम, ७ ल.पा. व १ को.प.बंधारा यांचे बांधकाम पूर्ण झाले असून त्याद्वारे १८६.१७९ दलघमी पाणीसाठा व ३३२१२ हे. सिंचन क्षमता निर्मिती करणेत आली आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## रायगड जिल्हयातील मुरुड जंजिरा पर्यटन महोत्सवाचे अनुदान मिळणेबाबत

**(११) ८६१४६ (१२-०८-२०१७). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हयातील मुरुड जंजिरा पर्यटन महोत्सव, २०१६ चे अनुदान मिळणेबाबतचा प्रस्ताव प्रधान सचिव, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान मुरुड जंजिरा नगरपरिषदेने सादर केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रस्तावावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (०१-०३-२०१८) :** (१) होय. तथापि, याबाबतचा प्रस्ताव महोत्सवाचा कालावधी, नगरपरिषदेचा ठराव, खर्चाचा तपशिल व पर्यटकांच्या वाढीच्या अनुषंगाने सविस्तर माहिती जिल्हाधिकारी, रायगड यांच्या दि.१७/११/२०१७ च्या पत्रान्वये शासनास प्राप्त झाली आहे.
(२) सदर प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**हिंगणघाट (जि.वर्धा) तालुक्यातील वणा नदीवर तयार करण्यात येणाऱ्या दिंडोरा प्रकल्पातील शेतकऱ्यांना मोबदला मिळण्याबाबत**

**(१२) ८८५३६ (२१-०८-२०१७). श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंगणघाट (जि.वर्धा) तालुक्यातील वणा नदीवर तयार करण्यात येणाऱ्या दिंडोरा प्रकल्पाला १७ वर्षाचा कालावधी उलटूनही अपूर्णच राहिल्याचे माहे एप्रिल मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २०१४ च्या शासन परीपत्रकानुसार सलग पाच वर्षात या पूर्वी संपादित केलेल्या जमिनीवर काम सुरु न झाल्यास संपादित जमीन तिच्या मुळ मालकास परत देणे बंधनकारक होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, स्थानिक प्रशासनाने संपादित जमीन मूळ मालकास परत देण्याचा शासनाने प्रस्ताव सादर केला आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रस्तावानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०३-०३-२०१८) :** (१) होय.
(२) नाही. सदर प्रकल्पास शासनाने दि.०६.०७.२००९ रोजी ४७६.८१ कोटी किंमतीस बहुउद्देशीय प्रकल्प म्हणून प्रशासकीय मान्यता दिली आहे.सदर प्रकल्पासाठी खाजगी जमिनीची आवश्यकता आहे. तसेच सदर प्रकल्पासाठी संपादित करण्यात आलेली खाजगी जमिन भूसंपादन अधिनियम-१८९४ अन्वये संपादित करण्यात आली असून त्यानुसार अंतिम मोबदला वाटप झाल्यामुळे सदर जमिनीचे ७/१२ फेरफार उतारे जलसंपदा विभागाच्या नावाने झाले आहेत. महसूल व वन विभागाच्या दि.१२/०३/२००४ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार संपादित जमिन थेट मूळ मालकास परत करता येत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**उंडणगाव (ता.सिल्लोड, जि.औरंगाबाद) येथील तिर्थक्षेत्र बालाजी संस्थान तिर्थक्षेत्राला 'ब' दर्जा देण्याबाबत**

**(१३) ८८८५३ (१२-०८-२०१७). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्हाधिकारी व जिल्हा नियोजन मंडळाने उंडणगाव (ता.सिल्लोड, जि.औरंगाबाद) येथील तिर्थक्षेत्र विकासातून वगळण्यात आल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उंडणगाव येथील तिर्थक्षेत्र बालाजी संस्थान तिर्थक्षेत्राला 'ब' दर्जा मिळावा अशी मागणी करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असलयास, या मागणीनुसार सदर तिर्थक्षेत्राला 'ब' दर्जा देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०५-०३-२०१८) :** (१) हे खरे नाही. बालाजी संस्थान, उंडणगाव (ता.सिल्लोड, जि.औरंगाबाद) या तिर्थक्षेत्रास "क" वर्ग दर्जा प्रदान करण्यात आला आहे. या ठिकाणी रु. १५.०० लक्ष निधी खर्च करून यात्रीनिवास बांधकाम पूर्ण करण्यात आले आहे. सन २०१७-१८ मध्ये रु. १०.०० लक्ष किंमतीचे काम प्रस्तावित करण्यात आले आहे.
(२) हे खरे नाही. उंडणगाव येथील बालाजी संस्थान तिर्थक्षेत्राला 'ब' दर्जा मिळणेबाबत मागणी करण्यात आलेली नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नांदगाव खंडेश्वर (जि.अमरावती) तालुक्यात तिर्थक्षेत्र विकास कार्यक्रमांतर्गत शिवणी रसुलपुर येथील त्रिवेणी संगमावर जाणा-या पोचमार्गाचे काम करण्याबाबत**

**(१४) ८८९०६ (१२-०८-२०१७). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदगाव खंडेश्वर (जि.अमरावती) तालुक्यात तिर्थक्षेत्र विकास कार्यक्रम २०१५-१६ अंतर्गत शिवणी रसुलपुर येथील त्रिवेणी संगमावर जाणाऱ्या पोचमार्गाचे काम मनमानीपणे करुन निधीचा दुरुपयोग करणाऱ्यावर कारवाई करण्यासह देवस्थानापासून रस्त्याचे काम करण्याबाबत लोकप्रतिनिधीनी दिनांक १६ जानेवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास मुख्य कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद अमरावती यांना लेखी पत्रान्वये कळविले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या पत्रानुसार निधीचा दुरुपयोग करणाऱ्यावर कारवाई करण्यासह देवस्थानापासून रस्त्याचे काम करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२२-०२-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सदर कामावर निधीचा कोणताही दुरूपयोग झालेला नाही. देवस्थानापर्यंतचा पोहोचमार्ग एकूण ७५० मीटर लांबीचा आहे. त्यापैकी ५३० मीटर लांबीचा रस्ता शेतक-यांच्या खाजगी शेतांमधून जातो व उर्वरीत २२० मीटर रस्ता सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मालकीचा आहे. खाजगी शेतापैकी शेतक-यांनी मोकळा करून दिलेल्या २२० मीटर रस्त्याचे ८० मि.मी. खडीचे व मुरूमाची (सोलिंग) बिछाईचे काम करण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अहमदनगर जिल्हयात ग्रामसेवकांची १०२ पदे रिक्त असल्याबाबत**

**(१५) ८९६४७ (१८-०८-२०१७). श्री.वैभव पिचड (अकोले) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अहमदनगर जिल्हयात ग्रामपंचायत सदस्य, प्रशासन व नागरीकांमध्ये समन्वय साधून विकास कामे करणाऱ्या ग्रामसेवकांची १०२ पदे रिक्त असून त्याची कामे अतिरिक्त पदभार देऊन ग्रामसेवकांकडे सोपविण्यात आल्याचे माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) तसेच पूर्ण क्षमतेने ग्रामसेवकांची पदे भरलेली नसल्याने अतिरिक्त पदभार ग्रामसेवकांना पेलवत नसल्याने विकासकांवर त्याचा विपरित परिणाम झालेला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, तदनुसार ग्रामसेवकांची पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२६-०२-२०१८) :** (१) होय.
(२) कमी लोकसंख्या असलेल्या ग्रामंचायतीचा अतिरिक्त कार्यभार जवळच्या ग्रामंचायतीच्या ग्रामसेवकाकडे सोपविण्यात आला असल्याने विकासकामांवर कोणताही विपरित परिणाम झालेला नाही.

(३), (४) व (५) शासन निर्णय वित्त विभाग २ जून, २०१५ अन्वये सरळसेवेच्या कोटयातील रिक्त असलेली सर्व पदे भरण्याबाबत वित्त विभागाने निर्बंध घातले असल्यामुळे सरळसेवेच्या कोटयातील सर्व रिक्त पदे भरण्यावर मर्यादा आल्या आहेत, त्यामुळे सरळसेवेच्या कोटयातील रिक्त पदे भरता आलेली नाहीत.

सर्व जिल्हा परिषदेच्या सरळसेवेच्या कोट्यातील रिक्त पदे ऑनलाईन पध्दतीने भरण्याचा निर्णय शासनाने दि.२४/०८/२०१७ रोजी घेतला आहे. त्यानुसार पदभरतीची कार्यवाही सुरु आहे.

---

**चाळीसगाव (जि.जळगाव) तालुक्यात जिल्हा परिषदेतील शिक्षकांना बदल्यांसाठी ऑनलाईन अर्ज भरण्यास विलंब लागत असल्याबाबत**

**(१६) ८९९९७ (२२-०८-२०१७). श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चाळीसगाव (जि.जळगाव) तालुक्यात जिल्हा परिषदेच्या १९० शाळा असून जवळपास ७५६ मराठी माध्यामाच्या व २८ उर्दू माध्यमाचे शिक्षक असून शिक्षकांना बदल्यांसाठी यंदापासून ऑनलाईन अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पंचायत समिती शिक्षण विभागाकडे याबाबत कोणत्याही प्रकारची माहिती नसल्याने शिक्षक बदलीचा हा ऑनलाईन गोंधळ वाढला असल्याची बाब दिनांक ११ जून, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२५-०२-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भंडारा जिल्हयात १ महिन्यांत ४ आणि राज्यात ६ मजुरांचा उष्माघाताने झालेला मृत्यू**

**(१७) ९०५४७ (२१-०८-२०१७). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा जिल्हयात १ महिन्यांत ४ आणि राज्यात ६ मजुरांचा उष्माघाताने माहे मे, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान मृत्यू झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भंडारा जिल्हयातील मोहगाव (करडी) पांदण येथे रोजगार हमी योजनेंतर्गत सुरु असलेल्या रस्त्यांच्या कामावर काम करणाऱ्या मंजुला रतिराम राखेड या ६२ वर्षीय महिलेचा उष्माघातांमुळे दिनांक १६ मे, २०१७ रोजी वा त्या सुमारास मृत्यू झाला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(४) असल्यास, त्यानुसार उष्माघात झालेल्या मजुरांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (०१-०३-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत भंडारा जिल्हयातील पंचायत समिती, मोहाडी येथील ग्रामपंचायत मोहगांव (करडी) कडून सुरु असलेल्या पांदन रस्त्याच्या कामावर काम करणा-या श्रीमती मंजुळा रतिराम राखडे या ५५ वर्षीय महिला मजुराचा दि.१६ मे, २०१७ रोजी सकाळी ९.३० वाजता कामावर मृत्यु झाला हे खरे आहे.
(३) सदर महिला मजुराच्या मृत्युबाबत उष्माघात मृत्यु संशोधन समिती, भंडारा यांचेमार्फत चौकशी करण्यात आली असून सदर समितीने दिलेल्या अहवालात श्रीमती मंजुळा रतिराम राखडे या महिलेचा मृत्यु उष्माघातामुळे झाला नसल्याचे नमूद करण्यात आले आहे. या जिल्हयात उष्माघातानी मजुरांचा मृत्यु झालेला नाही.
(४) तथापि, मृत महिला मजुराच्या कुटुंबियांना महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत रु.५०,०००/- इतकी आर्थिक मदत देण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**परांडा (जि.उस्मानाबाद) तालुक्यातील सीना कोळेगाव प्रकल्पावरील पूल दुरुस्त करण्याबाबत**

**(१८) ९१९६१ (१२-०८-२०१७). श्री.राहुल मोटे (परांडा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परांडा (जि.उस्मानाबाद) तालुक्यातील सीना कोळेगाव प्रकल्पावरील मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्यावरील पुलावर मोठा खड्डा पडून पुल नादुरुस्त झाला असून त्यामुळे भाविकांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, लोकप्रतिनिधींनी सदर पूलाच्या दुरुस्तीबाबत मा.मुख्यमंत्री व मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांना दिनांक २८ जून, २०१७ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदनाद्वारे कळविले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त पुलाच्या दुरुस्तीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२१-०२-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२) होय.
(३) परांडा तालुक्यातील सीना कोळेगाव प्रकल्पावरील मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्याची पाहणी केली असता पुलाचा कोणताही भाग खचलेला नसून, पुलाला कसलाही धोका नाही. पूल ते रस्ता जोडण्यासाठी केलेल्या पोहोच भरावाचे काम खचल्याचे दिसून आले आहे.

रोसा-डोमगाव-सोनारी काम सन २००३ पूर्वी झालेले आहे. नंतर कार्यकारी अभियंता (प्रधान मंत्री ग्रामसडक योजना) महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था, उस्मानाबाद अंतर्गत डांबरी करणाचे काम सन २०१० मध्ये झालेले आहे.

तसेच रस्त्यावर पडलेल्या डांबरी पृष्ठभागावरील खड्ड्यांच्या दुरुस्तीसाठी रस्ते विशेष दुरुस्ती अंतर्गत सन २०१७-१८ च्या कार्यक्रमामध्ये प्रस्तावित करुन मंजुरी नंतर काम हाती घेण्यात येणार असल्याबाबत कार्यकारी अभियंता (प्रमंग्रासयो), उस्मानाबाद, यांनी कळविले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नांदरुख ग्रामपंचायतीने पर्यावरण संतुलित ग्राम समृध्द योजनेतंर्गत वस्तूंच्या व रोपांच्या खरेदीत विद्‌यमान सरपंच व तत्कालीन ग्रामसेवक यांनी केलेला गैरव्यवहार

**(१९) ९४२७८ (२२-०८-२०१७). श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदरूख ग्रामपंचायतीने पर्यावरण संतुलित ग्राम समृद्ध योजनेतंर्गत वस्तूंच्या व रोपांच्या खरेदीत गैरव्यवहार करणारे दोषी सरपंच व ग्रामसेवक यांना पाठीशी घालण्यासाठी दोन विसंगत अहवाल सादर करणाऱ्या उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत विभाग), जि.प., सिंधुदुर्ग यांच्या कारभाराची चौकशी करण्याचे निर्देश सचिव, ग्रा.वि.वि. यांनी विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांना दिलेले असतानाही सदर प्रकरणाची चौकशी त्यांच्या ऐवजी उपायुक्त (विकास), कोकण विभाग यांनी केली असून, संबधित अधिकाऱ्याशी केलेल्या संगनमतामुळे दोषमुक्त असल्याचा अहवाल शासनास सादर केला असल्याची बाब माहे जुलै, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीत काय निष्पन्न झाले आहे,

(३) असल्यास, सदर प्रकरणातील अनियमितता दडपण्यासाठी शासनास हेतुपुरस्कर दोन विसंगत अहवाल सादर करणाऱ्या उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत विभाग) आणि त्यांना पाठीशी घालणाऱ्या उपायुक्त (विकास), कोकण विभाग यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२१-०२-२०१८) :** (१) व (२) अर्थसंकल्पिय अधिवेशन सन २०१६ मध्ये नांदरूख ग्रामपंचायतीने सन २०१३ ते २०१६ या कालावधीत पर्यावरण संतुलित समृध्द ग्राम योजनेंतर्गत वस्तुंच्या व रोपांच्या खरेदीत केलेल्या गैरव्यवहाराबाबत तारांकित प्र.क्र.५०२२७ उपस्थित केला होता. याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्या कार्यालयाकडून दिनांक ०३.०३.२०१६ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी करीता स्वाक्षरीने दिनांक ०८.०३.२०१६ रोजी प्राप्त अहवालानुसार, सदर प्रश्नाच्या उत्तरात आर्थिक गैरव्यवहार झाल्याचे

नाकारले होते. तथापि विनीयोगामध्ये अनियमितता झाल्याची पूरक टिपणी मध्ये नमूद करण्यात आले होते. याअनुषंगाने सदर तारांकित प्रश्नाचे उत्तर विधानमंडळास कळविण्यात आलेले होते. तथापि यासंदर्भात श्री. शरददादा सोनवणे, वि.स.स. यांनी माहिती अधिकारांतर्गत प्राप्त माहितीत अशा प्रकारचा गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आल्याचे पत्र दिले होते. यास्तव, याप्रकरणी सखोल चौकशी करून स्वयंस्पष्ट अहवाल सादर करण्याबाबत उप आयुक्त (विकास), कोकण विभाग यांना दिनांक २५.४.२०१६ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले होते. या अनुषंगाने उप आयुक्त (विकास) कोकण विभाग, यांनी शासनास दि.९.६.२०१६ रोजी अहवाल सादर केला आहे.

उप आयुक्त (विकास) कोकण विभाग यांचे अहवालानुसार तत्कालिन ग्रामसेवक व सरपंच यांनी अनियमितता केल्याचे दिसून आले. यामध्ये शासनास आर्थिक हानी झाल्याचे देखील दिसून आल्याने महाराष्ट्र जिल्हा परिषद (शिस्त व अपील) नियम, १९६४ मधील तरतूदीनुसार संबंधित ग्रामसेवकावर निलंबनाची कारवाई करून विभागीय चौकशी प्रस्तावित करण्याबाबत तसेच विद्यमान सरपंचावर महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ च्या कलम ३९(१) नुसार अपात्रतेची कारवाई करण्याकरिता प्रस्ताव सादर करण्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सिंधुदुर्ग यांना शासन पत्र दि.१७ सप्टेंबर, २०१६ अन्वये कळविण्यात आले.

तद्नंतर या विषयी श्री.सुनिल गोविंद शिंदे, विधान सभा सदस्य यांनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने शासन पत्र दिनांक ३०.०१.२०१७ च्या पत्रान्वये सदरहू प्रकरणी चौकशी करण्याबाबत विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांना कळविण्यात आले होते.

त्यानुसार विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचे मान्यतेने उपरोक्त विषयाबाबतचा चौकशी अहवाल उप आयुक्त (विकास), विभागीय आयुक्त कार्यालय, कोकण विभाग यांनी दिनांक १२.०३.२०१७ च्या पत्रान्वये शासनास सादर केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणी उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) दोषी नसल्याचे अहवालात नमूद करण्यात आलेले आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नदी जोड प्रकल्पांना मान्यता देण्याबाबत**

**(२०) ९४९७२ (२०-१२-२०१७). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २००२ मध्ये तत्कालीन शासनाने मांडलेल्या नदीजोड प्रकल्पाला केंद्र सरकार मान्यता देणार असल्याचे दिनांक ०२ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात काही ठिकाणी अतिवृष्टी तर काही ठिकाणी अनावृष्टी असते, त्यामुळे नदीजोड प्रकल्पाचा राज्यास फायदा होईल, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नदीजोड प्रकल्पास मान्यता देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२६-०२-२०१८) :** (१) केंद्रीय जलसंसाधन मंत्रालयाने १९८० साली जलसंपत्तीच्या विकासासाठी देशाच्या दृष्टीने महत्वाच्या असलेल्या नदीजोड योजनेचा कार्यक्रम (नॅशनल परस्पेक्टीव प्लान (NPP)) तयार केला आहे. सदर NPP नुसार देशातील विपुलतेच्या (Surplus) खोऱ्यातून तुटीच्या (Deficit) खोऱ्यात पाणी प्रवाही पध्दतीने किंवा १२०० मी. उंची पर्यंतच्या उपसाव्दारे पाणी वळविण्याचे नियोजित आहे.
(२) व (३) दिनांक ३.५.२०१० रोजी तत्कालीन मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, गुजरात व केंद्रीय जलसंसाधन मंत्री यांच्यामध्ये दमणगंगा-पिंजाळ व पार-तापी-नर्मदा या गुजरात व महाराष्ट्र राज्यातील आंतरराज्य नदीजोड योजनांच्या संदर्भात सामंजस्य करार झाला आहे. सदर करारानुसार राष्ट्रीय जलविकास अभिकरण, नवी दिल्ली यांनी तयार केलेल्या अहवालाच्या अनुषंगाने प्रथमत: प्रस्तावित पाणी वापरास महाराष्ट्र व गुजरात या दोन्ही राज्यांची संमती प्राप्त झाल्यावर केंद्र शासनामार्फत उभयतांशी करारनामा करण्यात आल्यानंतर सदर नदीजोड प्रकल्पाचे काम हाती घेण्याबाबत केंद्र शासनाकडून निर्णय घेण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाराष्ट्राच्या हद्दीवरील दमणगंगा-पिंजाळ-तापी प्रकल्पातील पाणी इतर राज्याला देण्यास शेतकऱ्यांचा होत असलेला विरोध**

**(२१) ९५६४१ (२६-१२-२०१७). श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.अजित पवार (बारामती), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्राच्या हद्दीवरील दमणगंगा-पिंजाळ-तापी प्रकल्पातील पाणी इतर राज्यांना देण्यास शेतकऱ्यांचा विरोध होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महाराष्ट्रात पाण्याची तूट असता इतर राज्यांना पाणी देण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, महाराष्ट्राला पुरेशा प्रमाणात पाणी मिळण्यासाठी इतर राज्यांना पाणी देण्याचा निर्णय रद्द करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२६-०२-२०१८) :** (१) सदर प्रकरणी लोक प्रतिनिधी/स्वायत्त संस्था प्रतिनिधी यांचा विरोध असल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) व (३) दमणगंगा-पिंजाळ नदीजोड प्रकल्पाबाबत राष्ट्रीय जलविकास अभिकरणाने तयार केलेल्या अहवालाच्या अनुषंगाने प्रथमत: प्रस्तावित पाणी वापरास महाराष्ट्र व गुजरात या दोन्ही राज्यांची संमती प्राप्त झाल्यावर केंद्र शासनामार्फत उभयपक्षी करारनामा करण्यात येईल. तदनंतर सदर नदी जोड प्रकल्पांचे काम हाती घेणेबाबत केंद्र शासनाकडून निर्णय घेण्यात येईल. या संदर्भात अद्याप कोणताही अंतिम निर्णय झालेला नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शिदोडी (ता.धामणगाव रेल्वे, जि.अमरावती) या गावातील पुनर्वसनाच्या समस्यांबाबत**

**(२२) ९६३६९ (२६-१२-२०१७). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लोअर वर्धा प्रकल्पाअंतर्गत शिदोडी (ता.धामनगाव रेल्वे, जि.अमरावती) या गावातील नाल्यांचे सांडपाणी गावाबाहेर निघत नसल्याने सांडपाणी थेट नागरीकांच्या घरात शिरत असल्याच्या अनेक समस्या निर्माण होत असल्याचे दिनांक २० जुन, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) तसेच पुनर्वसनाच्या कामात गावातील नाल्यांची खोली अतिशय कमी असल्याने पावसाचे पाणी नाल्यात साचून सांडपाणी थेट नागरिकांच्या घरात शिरल्याने गावातील नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार सांडपाणी गावाबाहेर जाण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०३-०३-२०१८) :** (१) होय.
दि. १९.०७.२०१७ रोजी रात्री जास्त पाऊस झाल्याने दि. २०.०७.२०१७ रोजी पावसाचे पाणी गावठाणातील नाल्यात शिरुन नाला तुंबल्याने गावात पसरले होते.
(२) गावठाणातील नाल्याची खोली संकल्पना नुसार ०.४५ मी. असून रुंदी ०.५५ व ०.६५ मी. घेण्यात आलेली आहे. भूखंड जमीन पातळी नुसार त्याखाली नाली बांधलेली आहे. परंतु पंचायत समिती मार्फत झालेले कॉंक्रीट रोडमुळे नाल्या खोल गेल्या असून रोड साईडचे बाजुची माती घसरुन, तसेच नालीच्या लगत प्रकल्पग्रस्त गुरेढोरे बांधीत असल्यामुळे व त्यांच्या वैरणामुळे नालीतील पाणी निघण्यास अडथळा निर्माण झाला आहे. प्रकल्पग्रस्तांनी बांधलेली बरीचशी घरे जोता न घेता जमीन पातळी वर आहे. त्यामुळे पावसाचे पाणी निचरा न होण्याची समस्या निर्माण होत आहे.
(३) पावसाचे पाणी निघुन जाण्याकरीता गावाबाहेरील नाल्याचे खोलीकरण करण्यात आले तसेच शिदोडी गावठाणातील उघडया गटारातील गाळ काढण्यात आला आहे. गावातील संपूर्ण नाल्याचे व गावाबाहेर पाणी वाहुन नेणाऱ्या मोठया नाल्याचे ग्रीड सर्व्हेक्षण करुन आवश्यक ती उपाययोजना करण्याचे नियोजित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील सुमारे २०० किल्ल्यांमध्ये पर्यटकांसाठी जागतिक दर्जाची निवास व्यवस्था उभारण्याबाबत**

**(२३) ९६३७७ (०६-०१-२०१८). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सुमारे २०० किल्ल्यांमध्ये पर्यटकांसाठी जागतिक दर्जाची निवास व्यवस्था उभारण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने निर्णय घेतला आहे काय व त्यांचे स्वरूप काय आहे,

(३) असल्यास, राज्यातील कोणकोणत्या किल्ल्यांचा समावेश यात करण्यात येणार आहे ?

**श्री. जयकुमार रावल (२१-०२-२०१८) :** (१) नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाराष्ट्र-गुजरात हद्दीतील दमणगंगा-पिंजाळ-तापी लिंक प्रकल्पात झालेला गैरव्यवहार**

**(२४) ९६६५६ (०६-०१-२०१८). श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र-गुजरात हद्दीतील दमणगंगा-पिंजाळ-तापी लिंक प्रकल्पात गैरव्यवहार होत असल्याचे प्रकरण नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी मॅगसेस पुरस्कार प्राप्त जलतज्ञ राजेंद्र सिंह यांनी मा.मुख्यमंत्र्यांशी दिनांक २१ सप्टेंबर, २०१७ रोजी झालेल्या बैठकीत याप्रकरणाची चौकशी करावी अशी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मागणीनुसार उक्त गैरव्यवहाराची चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास,चौकशीनुसार दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०१-०३-२०१८) :** (१) अशी कोणतीही बाब निदर्शनास आलेली नाही.

(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हिंगोली जिल्हयात जलसंपदा विभागाला स्वतंत्र कार्यालय, आवश्यक मनुष्यबळ व विकासकामांसाठी निधी मिळण्याबाबत**

**(२५) ९६७९३ (२६-१२-२०१७). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्हयात जलसंपदा विभागाला स्वतंत्र कार्यालय व आवश्यक मनुष्यबळ नसल्याने काही कार्यालये बंदच रहात असल्याने या कार्यालयामार्फत जिल्हयात एकही काम सुरु होत नसल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीनुसार जलसंपदा विभागाला स्वतंत्र कार्यालय, आवश्यक मनुष्यबळ व विकासकामांसाठी निधी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२७-०२-२०१८) :** (१) हे खरे नाही.

लघु पाटबंधारे विभाग, हिंगोली हे विभागीय कार्यालय ५ उपविभागांसह हिंगोली जिल्हयात दिनांक ०१.०१.२०१७ पासून कार्यरत असून, सदर कार्यालयात ४१ पदे कार्यरत आहेत. या विभागाकडे ५ लघु प्रकल्पांची कामे असून, पूर्णा नदीवरील तीन बंधाऱ्यांच्या प्रस्तावाबाबत क्षेत्रिय स्तरावर कार्यवाही चालू आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### पळशी (ता.खानापूर, जि.सांगली) गावाचा टेंभू योजनेच्या लाभक्षेत्रात समावेश करण्याबाबत

**(२६) ९६९९३ (०६-०१-२०१८). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पळशी (ता.खानापूर, जि.सांगली) येथील ग्रामस्थांनी पळशी गावाचा टेंभू योजनेच्या लाभक्षेत्रात समावेश होईपर्यंत ग्रामपंचायतींसह सर्व निवडणूका आणि सामाजिक कार्यक्रमांवर सामुहिक बहिष्कार घालण्याचा निर्णय दिनांक २२ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार पळशी गावाचा टेंभू योजनेच्या लाभक्षेत्रात समावेश करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२१-०२-२०१८) :** (१) होय.

(२) टेंभू प्रकल्पाच्या मंजूर प्रकल्प अहवालानुसार टेंभू प्रकल्पाच्या लाभक्षेत्रामध्ये खानापूर तालुक्यातील ४५ गावांचा समावेश आहे. यामध्ये मौजे पळशी गावाचा समावेश प्रकल्पाच्या लाभक्षेत्रामध्ये सद्य:स्थितीत नाही.

तथापि टेंभू प्रकल्प टप्पा क्र. ५ (भूड) ची उंची वाढविण्याच्या प्रस्तावानुसार गोरेवाडी कालवा पळशी गावातून जाणार असल्याने त्याचा समावेश करून व्दितीय सुधारित प्रशासकीय मान्यतेसाठी प्रस्ताव कार्यकारी संचालक, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाने दिनांक २ ऑगस्ट, २०१७ पत्रान्वये राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समिती (२) कडे सादर केला आहे.

या सुधारित प्रशासकीय मान्यतेच्या अहवालाच्या अधीन राहून सविस्तर सर्व्हेक्षणानंतरच पळशी गांवाचा टेंभू प्रकल्पाच्या एकूण लाभक्षेत्रात बदल न होता समावेश होऊ शकेल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मलेशिया सरकारने शासकीय कामकाजात वेगाने परिर्वतन घडवून आणण्यासाठी स्थापन केलेले "पेमांडू" नावाचे युनिट राज्यात लागू करणेबाबत**

**(२७) ९८२७२ (०६-०१-२०१८). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.नारायण पाटील (करमाळा) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने शालेय शिक्षण व क्रिडा, सार्वजनिक आरोग्य, पाणी पुरवठा व स्वच्छता या विभागाच्या कामकाजात वेगाने परिवर्तन घडवून आणण्यासाठी व वैशिष्ट्यपूर्ण काम करण्यासाठी मलेशिया सरकारने शासकीय कामकाजात वेगाने परिर्वतन घडवून आणण्यासाठी स्थापन केलेले "पेमांडू" नावाचे युनिट स्विकारले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पेमांडू कार्यपध्दतीच्या अंमलबजावणीची सद्यःस्थिती काय आहे व एकूण स्वरुप काय आहे,

(३) अद्याप निर्णयाच्या अनुषंगाने अंमलबजावणी सुरु झाली नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२६-०२-२०१८) :** (१), (२) व (३) राज्य मंत्रीमंडळाच्या दि. २६ सप्टेंबर, २०१७ च्या बैठकीतील निर्णयानुसार “PEMANDU Malaysia” या संस्थेच्या नावात “PEMANDU Associates” अशा प्रकारचा जो बदल झाला आहे, त्या अनुषंगाने केंद्र शासन व निती आयोग स्तरावर सुधारित “सामंजस्य करार” करण्यात येत आहे किंवा कसे, याबाबत राज्य शासनाने निती आयोगाकडे विचारणा केली होती. निती आयोगाने PEMANDU, Malaysia या संस्थेएवजी “International Strategic Co-operation Unit (ISCU)” या संस्थेबरोबर सुधारित सामंजस्य करार (Amendment Protocol) करण्याबाबत केंद्र शासन स्तरावर कार्यवाही सुरू आहे, असे कळविले आहे. निती आयोगामार्फत सुधारित सामंजस्य करार (Amendment Protocol) ची प्रत उपलब्ध झाल्यानंतर त्यामधील तरतूदीनुसार या प्रकरणी पुढील कार्यवाही करण्यात येईल.

---

**नागपूर जिल्हयात कमी पाऊस झाल्याने खरीप व रबी हंगामाकरिता शेतक-यांसाठी ५ टीएमसी पाण्याची मागणी केल्याबाबत**

**(२८) ९८३६१ (०२-०१-२०१८). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्हयात कमी पाऊस झाल्याने पेंच संभागातील १ लक्ष २० हजार हेक्टर क्षेत्रसिंचनाखाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतक-यांसाठी मध्यप्रदेश सरकार यांच्याकडे खरीप व रबी हंगामाकरिता शेतकऱ्यांसाठी ५ टीएमसी पाण्याची मागणी केलेली आहे, हे ही खर आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनान कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०१-०३-२०१८) :** (१) हे खरे नाही.

पेंच प्रकल्पाचे लाभक्षेत्र नागपूर व भंडारा जिल्हयात असून प्रकल्पीय सिंचन क्षमता १,०४,४७६ हे आहे. त्यातुलनेत मागील ०३ वर्षात सरासरी १,१७,९५० हे क्षेत्रावर प्रत्यक्ष सिंचन झाले आहे.

यावर्षी पेंच प्रकल्पाचे पाणलोट क्षेत्रात १४५९ मी.मी. पावसाचे तुलनेत यावर्षी ९३६.९० मी.मी. पर्जन्यमान झालेले असल्याने उपलब्ध जलसाठ्या नूसार खरीप हंगामात ५५,००० हे व रब्बी हंगामात ३०,००० हे क्षेत्रावर सिंचन करण्याचे नियोजन आहे.

(२) अंशत: खरे आहे.

(३) मध्यप्रदेशातील चौराई धरणातून ५.०० टी.एम.सी. पाणी तोतलाडोह धरणाकरीत सोडण्याबाबत शासनास स्तरावरून प्रधान सचिव (जसं), जलसंपदा विभाग यांच्या दिनांक २४.१०.२०१७ च्या पत्रान्वये प्रधान सचिव, जलसंसाधन संभाग, मध्यप्रदेश राज्य यांना विनंती करण्यात आली आहे.

तसेच मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या दि.०२.०२.२०१८ च्या पत्रान्वये मा.मुख्यमंत्री, मध्यप्रदेश राज्य यांना पुनश्च विनंती करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**लिंबोटी (ता.लोहा, जि.नांदेड) धरणामधून उपसा सिंचन योजना सुरु करण्याबाबत**

**(२९) ९९५९१ (२६-१२-२०१७). श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.मोहन फड (पाथरी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदपूर परीसरातील लिंबोटी (ता.लोहा, जि.नांदेड) येथील धरणात सदर धरणातील पाण्याखाली अहमदपूर मोठे क्षेत्रे व्यापलेले आहे परंतु अहमदपूर तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी

सदर धरणातील पाण्याचा फारसा उपयोग होत नसल्याने हडोळती व खंडाळी परिसरातील या धरणामधून उपसा सिंचन योजना सुरु करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधिंनी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच सदर योजना मंजुरीसाठी शासन त्वरित कारवाई करेल असे दिनांक १५ डिसेंबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास आश्वासन देवूनसुद्धा कोणतीही कार्यवाही झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे व चौकशीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०३-०३-२०१८) :** (१) होय.

(२) नाही. लोकप्रतिनिधींकडून प्राप्त निवेदन डिसेंबर २०१५ मधील आहे. या निवेदनावरील "तपासून अहवाल सादर करावा" या मा.मंत्री (जलसंपदा) महोदयांच्या निर्देशानुसार, प्रकल्पांच्या मंजूर जल नियोजनानुसार पाणी शिल्लक नसल्याने प्रस्तुत उपसा सिंचन योजना राबविणे तांत्रिकदृष्ट्या शक्य होणार नाही

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**इगतपूरी (जि.नाशिक) येथील वाकी खापरी आणी भाम धरण प्रकल्पातील बाधीत धरणग्रस्तांना मोबदला देण्याबाबत**

**(३०) ९९७३९ (०२-०१-२०१८). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इगतपूरी (जि.नाशिक) येथे पंतप्रधान कृषी सिंचन योजनेच्या स्वतंत्र निधीतून पूर्ण करण्यात येणाऱ्या वाकी खापरी आणी भाम धरण प्रकल्पातील बाधीत धरणग्रस्तांना हेक्टरी ९ लाख रुपयांचा मोबदला देण्यात येत असल्याचे माहे जुलै, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, समृध्दी महामार्गातील प्रकल्पग्रस्तांना हेक्टरी ८० लाख मोबदला दिला जाणार आहे तसेच भाम धरणग्रस्तांचे संपूर्ण पूनवर्सन झाले नसतानाही घळभरणीला परवानगी देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार सदर धरणग्रस्तांन हेक्टरी ८० लाखांचा मोबदला देण्यासह भाम धरणग्रस्तांचे संपूर्ण पूनवर्सन होईपर्यंत घळभरणीला परवानगी न देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२२-०२-२०१८) :** (१) नाही.

प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेतून नांदूर मधमेश्वर प्रकल्पांतर्गत इगतपुरी तालुक्यातील वाकी धरणासाठी जुन्या भुसंपादन कायद्यानुसार संपादित करण्यात आलेल्या जमिनीचा मोबदला मंजूर अंतिम निवाड्याप्रमाणे अदा करण्यात आलेला आहे. त्या अनुषंगाने कलम १८ खाली मा.न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार वाढीव मोबदल्याची रक्कम अदा करण्यात आली आहे.

तसेच भाम धरणासाठी संपादित करण्यात येत असलेल्या जमिनी गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाच्या नियामक मंडळाच्या दि.१४/०७/२००९ च्या ३८ व्या बैठकीमध्ये पारित करण्यात आलेल्या ठराव क्र. ३८/८ नुसार रु. ७.९० लक्ष प्रति हेक्टर दराने तसेच महसूल व वन विभागाच्या दिनांक ०१/०२/२०१० च्या पत्रान्वये दिलेल्या निर्देशानुसार सरळ खरेदीने भूसंपादन करण्यात येत आहे.

(२) समृध्दी महामार्गातील प्रकल्पग्रस्तांना मोबदला देण्याची बाब या विभागाशी संबंधीत नाही.

तथापी, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेचे (PMKSY) नियोजनाप्रमाणे पुनर्वसनासह भाम धरणाचे काम पूर्ण करण्याच्या दृष्टीने जून, २०१७ पर्यंत ५८३.४४ मी. तलांका पर्यंत अंशत: घळभरणीस परवानगी देण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

परंतु प्रधानमंत्री कृषी सिंचन योजने (PMKSY) च्या नियोजनाप्रमाणे भाम धरणाचे पुनर्वसनासह घळभरणीबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### सूर्या प्रकल्पाचे पाणी पालघर जिल्ह्याबाहेर न देण्याबाबत

**(३१) ९९९८२ (०२-०१-२०१८). श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.नसीम खान (चांदिवली), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सूर्या प्रकल्पाचे ८० टक्क्यांहून अधिक पाणी वसई-विरार, मिरा-भाईंदरला वळविण्यात आल्याने भविष्यात पालघर जिल्ह्यातील सिंचन क्षेत्रासह लोकांना हक्काच्या पाण्यापासून वंचित राहावे लागणार असल्याने पालघर जिल्ह्यात बंद पुकारण्यात आल्याचे दिनांक १८ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीनुसार पाणीटंचाई असणाऱ्या संबंधित भागामध्ये स्वतंत्र पाण्याची व्यवस्था करण्यासह सुर्या प्रकल्पातून उपलब्ध होणारे पाणी पालघर जिल्ह्याबाहेर न देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२७-०२-२०१८) :** (१) होय.

(२) नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

तथापी, सूर्या प्रकल्पाचे अद्ययावत मंजूर प्रकल्प अहवालानुसार पालघर जिल्हयातील १४६९६ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आणण्यासाठी १९६.७२ द.ल.घ.मी. पाणी वापराची तरतूद होती. वसई-विरार, मिरा-भाईंदर या मनपास व ग्रामीण भागासाठी पिण्याचे पाणी पुरवठा करणेसाठी आरक्षण मंजूर केल्यानंतर सिंचनासाठी ८९.२१५ द.ल.घ.मी. पाणी तुट येत आहे. त्यामुळे एकूण १४६९६ हेक्टर सिंचन क्षमतेमधून ६६६४ हे. सिंचन क्षमता कमी होणार असून प्रकल्पीय सिंचनक्षमता ८०३२ हे. इतकी राहणार आहे.

महाराष्ट्र राज्याच्या जलनितीत पिण्याच्या पाण्यास प्रथम प्राधान्य असल्याने सिंचन क्षेत्रास कपात करणे प्रस्तावित आहे.

सुर्या प्रकल्पाचा सुधारित जलनियोजन मंजूर करण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

---

## चोपडा (जि.जळगाव) तालुक्यातील गावांना पूर संरक्षण भिंतीच्या बांधकामासाठी निधी देण्याबाबत

**(३२) १००२४५ (०२-०१-२०१८). श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चोपडा (जि.जळगाव) तालुक्यातील गावांना अतिवृष्टी झाल्यास नद्यांचे पाणी घुसून मालमत्तेचे नुकसान व जीवित हानी होऊ नये यासाठी गावांना पूर संरक्षण भिंतीच्या बांधकामासाठी आवश्यक असलेला निधी उपलब्ध करुन देण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास मा.जलसंपदा मंत्री, राज्यमंत्री यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने संरक्षण भिंतीच्या बांधकामासाठी निधी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२७-०२-२०१८) :** (१) चोपडा तालुक्यातील गावांना पूर संरक्षण भिंती बांधण्याकरीता मा.श्री.चंद्रकांत सोनवणे, माननीय विधान सभा सदस्य यांनी जळगाव पाटबंधारे प्रकल्प मंडळ, जळगाव यांचेकडे मागणी केलेली आहे.

(२) सदर मागणीच्या अनुषंगाने सर्वेक्षण करुन अंदाजपत्रक तयार करण्याची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर प्रगतीत असून निधी उपलब्धतेनुसार प्रशासकीय मान्यता काम करण्याचे नियोजन आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात १० लाख शेतकऱ्यांची जन धन खाती बनावट असल्याबाबत

**(३३) १००५०२ (११-०१-२०१८). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात १० लाख शेतकऱ्यांची जन धन खाती बनावट असल्याचे राज्याचे मा.महसूल मंत्री यांनी घोषित केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या बनावट खात्यावर किती रक्कमेचा व्यवहार करण्यात आला याबाबत शासनाने माहिती घेतली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे, व चौकशीत काय आढळून आले,

(४) असल्यास, त्यानुसार शासनाने दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०१-०३-२०१८) :** (१) मा.मंत्री (महसूल) यांचे कार्यालयाने उपलब्ध करुन दिलेल्या माहितीनुसार मा.मंत्री (महसूल) यांनी जन धन खाती बनावट असल्याचे कोणतेही विधान केलेले आढळून येत नाही.

(२) प्रश्न उदभवत नाही.

(३) राज्यस्तरीय बँकर्स समिती, महाराष्ट्र राज्य यांचेकडून प्राप्त माहितीनुसार नागरिकांची जन धन खाती बँकांकडून केंद्र सरकार व भारतीय रिझर्व्ह बँक यांच्या वेळोवेळी जारी केलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार स्विकारली व उघडली जातात. महाराष्ट्र राज्यात राष्ट्रीयकृत व खाजगी बँकांमार्फत एकूण २,१५,८६,७०६ जन धन खाती दिनांक १५.११.२०१७ अखेर उघडलेली आहेत.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कृष्णा - मराठवाडा प्रकल्पा अंतर्गत मराठवाड्यासाठी २१ टी.एम.सी. पाणी देण्याच्या प्रस्तावाबाबत

**(३४) १००५७३ (२६-१२-२०१७). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कृष्णा - मराठवाडा प्रकल्पा अंतर्गत मराठवाड्यासाठी २१ टी.एम.सी. पाणी देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावाचे थोडक्यात स्वरूप काय आहे व सदर प्रस्तावाची सद्यस्थिती काय आहे,

(३) असल्यास, सदर प्रस्तावाची अंमलबजावणी तात्काळ करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२८-०२-२०१८) :** (१) व (२) शासनाने दि. ०७/०७/२००९ च्या पत्रान्वये कृष्णा मराठवाडा सिंचन प्रकल्पाच्या २३.६६ अ.घ.फू. पाणी वापराच्या सुधारीत जल नियोजनास मान्यता दिली आहे. त्या प्रमाणे प्रकल्पाचे रू.४८४५.०५ कोटी रक्कमेच्या सुधारित प्रशासकीय मान्यता अहवालास दि. २७/०८/२००९ अन्वये शासनाने मान्यता दिली आहे. या प्रकल्पाचे काम दोन टप्प्यात करावयाचे असून प्रथम टप्पा ७ अ.घ.फू. पाणी वापरासाठी व व्दितीय टप्पा १६.६६ अ.घ.फू. पाणी वापरासाठी प्रस्तावित आहे. प्रथम टप्पा पाणी वापराची उर्वरित किंमत रू. ४८१७ कोटी आहे. सदर कामे ४ वर्षाच्या कालबध्द मर्यादेत पूर्ण करता यावीत या उद्देशाने कामासाठी लागणारा निधी हा मा.राज्यपाल महोदयांच्या निधी वाटपाचे सूत्राबाहेर ठेवण्याची विनंती मा.राज्यपाल महोदयांना करण्याचा निर्णय दिनांक ४ ऑक्टोबर, २०१६ रोजी औरंगाबाद येथे झालेल्या मंत्रीमंडळाच्या बैठकीमध्ये झालेला आहे. त्यानुसार दिनांक २५ ऑक्टोबर, २०१६ रोजी मा.मुख्यमंत्री यांनी उपरोक्त निधी मा.राज्यपाल महोदयांचे निधी वाटप सुत्राच्या निर्देशाबाहेर ठेवण्याबाबत विनंती केलेली आहे.

(३) या प्रकल्पाचे काम करण्यासाठी उस्मानाबाद पाटबंधारे मंडळ, उस्मानाबाद, अंतर्गत २ विभाग व औरंगाबाद पाटबंधारे मंडळातर्गत १ विभाग कार्यरत आहे व सध्या सदर आस्थापना पुरेशी आहे. मा.राज्यपाल महोदयांनी सन २०१७-१८ मधील कृष्णा मराठवाडा प्रकल्पासाठीचा निधी निर्देशाबाहेर ठेवण्यास मान्यता दिली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कृष्णा खोरे विकास महामंडळ पुणेच्या कोल्हापूर पाटबंधारे मंडळातंर्गत दूधगंगा कालवे विभागातील दोन विभागीय कार्यालयाची पाच उपविभागीय कार्यालये बंद करण्याच्या निर्णयाबाबत**

**(३५) १००७९१ (२६-१२-२०१७). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कृष्णा खोरे विकास महामंडळ पुणेच्या कोल्हापूर पाटबंधारे मंडळ अंतर्गत दूधगंगा कालवे विभाग १ कोल्हापूर (बांधकाम) व वारणा कालवे विभाग १, इस्लामपूर (बांधकाम) या दोन विभागीय कार्यालयाची पाच उपविभागीय कार्यालये बंद करण्याचा निर्णय जलसंपदा विभागाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरचा निर्णय घेण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, या कार्यालयाचा कार्यभार कोणाकडे वर्ग करण्यात येणार आहे ?

**श्री. गिरीष महाजन (२७-०२-२०१८) :** (१) होय. अंशत: खरे आहे. दोन विभागीय कार्यालयाची एकूण ४ उपविभागीय कार्यालये बंद करण्यात आली आहेत.

(२) वारणा व दूधगंगा या मोठ्या प्रकल्पावरील शिल्लक क्षेत्रीय कामे व उपलब्ध उपविभागीय कार्यालयांचा आढावा घेऊन प्रशासकीय कारणास्तव ४ उपविभागीय कार्यालये बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

(३) या कार्यालयांचा उर्वरित कार्यभार प्रदेश कार्यालयाच्या आदेशानुसार मंडळांतर्गतच्या अन्य उपविभागीय कार्यालयांकडे सोपविण्यात आला आहे.

---

**उंबरखेड परीसरात डावा कालवा परक्युलेशनमुळे**
**शेत जमीनीचे होत असलेले नुकसान**

**(३६) १०१२९० (२६-१२-२०१७). श्री.अनिल कदम (निफाड) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उंबरखेड परिसरात डावा कालवा परक्युलेशनमुळे शेत जमीनीचे नुकसान होत असल्याने पालखेड कालव्यावर नुकसान टाळण्यासाठी केलेल्या स्वतंत्र चारीची व्यवस्था पुनरुज्जीवन करण्याबाबत लोकप्रतिनिधींनी मा.जलसंपदा मंत्री यांना दिनांक ४ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास पत्र दिलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्वतंत्र चारीची व्यवस्था पुनरुज्जीवन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२१-०२-२०१८) :** (१) होय

(२) लोकप्रतिनिधींच्या निवेदनाच्या अनुषंगाने संबंधीत क्षेत्रिय कार्यकारी अभियंता यांनी दि.३०.०९.२०१७ रोजी प्रत्यक्ष क्षेत्रीय स्थळाची पाहणी केली आहे. कालव्यातून होणारा पाझर थांबिवणेसाठी आवश्यक त्या उपाययोजना करणेसाठीच्या बाबींचे अंदाजपत्रक तयार करणेचे काम प्रगतीपथावर आहे.

तसेच याबाबत कार्यकारी अभियंता पाटबंधारे संशोधन विभाग, नाशिक यांचे कार्यालयामार्फत निवेदनात नमूद असलेल्या भागांची पाहणी करुन अहवाल अधीक्षक अभियंता व संचालक, पाटबंधारे संशोधन व विकास संचालनालय, पुणे यांना सादर केलेला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजे सुळेवाडी (ता.माळशिरस,जि.सोलापूर) येथील पाझर तलावासाठी (न्हाणी खोरे)**
**शेतकऱ्यांच्या संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला मिळण्याबाबत**

**(३७) १०१४१२ (२६-१२-२०१७). श्री.गणपतराव देशमुख (सांगोले) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे सुळेवाडी (ता.माळशिरस, जि.सोलापूर) येथील पाझर तलावासाठी (न्हाणी खोरे) शेतकऱ्यांच्या जमिनी १५ वर्षापेक्षा अधिक काळ ताब्यात घेऊनही भूसंपादन कायदा १९८४ च्या कलम ४ खाली काढलेल्या नोटिसा व्यपगत झाल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, १९९४ सालचा कायदा रद्द झाल्यानंतर सन २०१३ साली नवीन भूसंपादन कायदा अस्तित्वात येऊनही अद्यापपर्यंत वरील पाझर तलावात जमीन गेलेल्या शेतकऱ्यांना मोबदला मिळाला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार पाझर तलावासाठी संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला संबंधित शेतकऱ्यांना मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (२१-०२-२०१८) :** (१), (२) व (३) पाझर तलाव सुळेवाडी (न्हाणी खोरे) ता.माळशिरस, जि.सोलापूर साठी संपादित जमिनीचा निवाडा नवीन भूसंपादन कायद्यानुसार दि.१८.०५.२०१६ रोजी घोषित करण्यात आला आहे. त्यानुसार विभागीय आयुक्त, पुणे यांची मागणी विचारात घेवून या प्रकरणात रु. ७५,९१,६११/- इतका मोबदला दि.१५.११.२०१७ रोजी मंजूर करण्यात आला आहे व तो विभागीय आयुक्त, पुणे यांना पुढील कार्यवाहीसाठी देण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### सांगली येथे पाटबंधारे विभागाच्या कर्मचाऱ्यांकरिता असलेल्या वारणाली कॉलनीमधील सदनिकांची झालेली दुरवस्था

**(३८) १०१४३८ (०२-०१-२०१८). श्री.धनजंय (सुधीर) गाडगीळ (सांगली) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सांगली येथे पाटबंधारे विभागाच्या कर्मचाऱ्याकरिता असलेल्या वारणाली कॉलनीमधील अनेक सदनिका कोसळल्या असून उर्वरित सदनिका कोसळण्याच्या स्थितीत असल्याने कर्मचाऱ्यांच्या जिवीतास धोका निर्माण झाला असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संबंधित विभागाने या वसाहत दुरुस्तीचा साधारण ५ कोटी रुपयांचा प्रस्ताव शासनास सादर केला असून तो प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रस्तावास तात्काळ मंजूरी देऊन निधी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२३-०२-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.
वारणाली वसाहत सांगली येथे २१ निवासी इमारती असून त्यापैकी २ इमारती राहण्यास अयोग्य असलेचे निदर्शनास आले आहे. उर्वरीत इमारतींची किरकोळ दुरूस्ती आवश्यक आहे.
(२) व (३) हे खरे नाही.

वारणाली वसाहत दुरुस्तीसाठी सन २०१७-१८ चे देखभाल व दुरूस्ती प्रापणसुची मध्ये तरतूद केली आहे, २ निवासी इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडीट झालेनंतर दुरूस्तीचे काम हाती घेण्यात येणार असून निधीच्या उपलब्धतेनुसार दुरुस्तीची कामे प्रगतीपथावर आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्य शासनाने कर्मचारी कपात करण्याचा घेतलेला निर्णय**

**(३९) १०१६४० (०२-०१-२०१८). श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) संगणकाच्या वापरामुळे कामकाज कमी झाल्याची सबब देत रिक्त जागांवर होणारी कर्मचारी भरती शासनाकडून ३० टक्के कर्मचारी भरती कमी करण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे माहे ऑगष्ट, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास,कमी होणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या संख्येमुळे त्या ठिकाणी पूर्वी असलेल्या कर्मचाऱ्यावर कामाचा ताण / व्याप वाढू शकतो त्यामुळे भरतीतील कपात रद्द करण्यात यावी अशी मागणी कर्मचारी संघटनेने केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर मागणीनुसार कर्मचारी भरतीतील कपात रद्द करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२८-०२-२०१८) :** (१) नाही.
(२) कास्ट्राईब कर्मचारी संघटना यांनी शासकीय/निमशासकीय कर्मचाऱ्यांचे ३० टक्के कपातीचे धोरण रद्द करुन मागासवर्गीयांचा अनुशेष भरुन काढण्याबाबतचे निवेदन दि.०४/१२/२०१७ रोजीच्या पत्रान्वये शासनास सादर केले आहे.
(३) व (४) महसूली उत्पन्नापेक्षा वेतनावरील खर्च अधिक होत असल्याने व वेतनावरील खर्च नियंत्रित करण्याकरीता रिक्त पदे भरतीवर काही प्रमाणात निर्बंध घालण्यात आलेले आहेत. तथापि, शिक्षक, पोलीस कॉन्स्टेबल, ग्राम सेवक, तलाठी, आरोग्य परिचारीका, पशुधन परीवेक्षक, मत्स्य व्यवसाय विभागाचे तालुका स्तरावरील अधिकारी, वन रक्षक, कृषी सहायक, पाटबंधारे विभागाचे कनिष्ठ अभियंता या सवंर्गातील एकूण रिक्त पदांपैकी ५० टक्के पर्यंत पदे भरण्यास व अत्यावश्यक सेवा म्हणून शासकीय रुग्णालयातील डॉक्टर्स तसेच शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील अध्यापक वर्ग व पॅरामेडीकल स्टाफ तसेच शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालयातील डॉक्टर्स, अध्यापक व पॅरामेडीकल स्टाफ यांना पदभरतीच्या निर्बंधातून वगळण्यात आले असून रिक्त पदांच्या ७५% मर्यादेत सदर पदांच्या सेवाप्रवेश नियमातील भरती प्रक्रियेचे पालन करुन पदे भरण्यास मुभा देण्यात आली आहे. असे असले तरी देखील याप्रमाणात वाढ करुन अधिक प्रमाणात रिक्त पदे भरणे आवश्यक आहे असे

प्रशासकीय विभागाचे मत असल्यास सदर पदे भरण्यासाठी अपर मुख्य सचिव (सेवा) सामान्य प्रशासन विभाग यांच्या अध्यक्षतेखालील समितीच्या मान्यतेने पदे भरण्याची कार्यवाही केली जाते.

---

**चंद्रपूर जिल्हयातील युवक - युवतींना उद्योग उभारण्यासाठी कर्ज मिळण्याबाबत**

**(४०) १०१६७६ (२६-१२-२०१७). ॲड.संजय धोटे (राजूरा) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रमांतर्गत चंद्रपूर जिल्ळयातील ७८१ प्रकरणांपैकी ४८३ प्रकरणे राष्ट्रीयकृत बँकांनी नाकारले असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनासआले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुषंगाने चंद्रपूर जिल्हयातील युवक - युवतींना उद्योग उभारण्यासाठी कर्ज मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२७-०२-२०१८) :** (१) व (२) होय.

पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेअंतर्गत शासनाने २५० प्रकरणांचे उद्दिष्ट दिले होते. सन २०११-१२ ते २०१७-१८ पर्यंत विविध बँकांना ७८१ प्रकरणे सादर केली त्यापैकी २७३ प्रकरणे मंजूर करण्यात आली असून ४८३ प्रकरणे परत करण्यात आली आहेत. २५० प्रकरणांचे उद्दिष्टापेक्षा जास्त प्रकरणे मंजूर झाली आहेत.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**झरी उपसा सिंचन (ता.अर्जुनी मोरगांव, जि.गोदिया) प्रकल्पाचे काम पुर्ण करण्याबाबत**

**(४१) १०१७२६ (२६-१२-२०१७). श्री.राजेश काशीवार (साकोली), श्री.चरण वाघमारे (तुमसर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) झरी उपसा सिंचन प्रकल्प (ता.अर्जुनी मोरगांव, जि.गोंदिया) भंडारा जिल्ह्यातील लाखांदूर, साकोली व गोंदिया जिल्ह्यातील अर्जुनी मोरगांव तालुक्यातील १८ गावांना लाभान्वित करणार असून सन २००५ साली मान्यता प्राप्त झालेले हे प्रकल्प अजूनही अपूर्ण आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक १६ जून,२०१६ रोजीच्या बैठकीत झरी उ.सिं.यो. चे लाभक्षेत्र धापेवाडा टप्पा-२ किंवा झरी उ.सिं.यो. यापैकी कोणत्या योजनेत घ्यावे, याविषयी लोकप्रतिनिधींना अवगत करुन अहवाल सादर करण्याचे निर्देश मंडळ कार्यालयाकडून कार्यकारी अभियंता, उपसा सिंचन प्रकल्प विभाग, तिरोडा, जि.गोंदिया यांना दिनांक २७ सप्टेंबर, २०१६ रोजीच्या पत्रान्वये देण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कार्यकारी अभियंता, उ.सिं.यो. प्रकल्प, तिरोडा यांनी अद्याप अहवाल सादर केला नसून मा.राज्यमंत्री, जलसंपदा यांनी झरी उ.सिं.यो. विषयी तात्काळ बैठक घेऊन निर्णय घेण्याचे आश्वासन दिले होते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, झरी उपसा सिंचन योजना तातडीने पुर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२६-०२-२०१८) :** (१) नाही.
प्रस्तावित झरी उपसा सिंचन योजना सद्य:स्थितीत अन्वेषणाधीन आहे.
(२) होय.
झरी उपसा सिंचन योजनेसाठी दि. १६ जून, २०१६ रोजीच्या स्थायी समितीच्या बैठकीत असे निर्देश कार्यकारी अभियंता, झरी उपसा सिंचन प्रकल्प विभाग, तिरोडा यांना देण्यात आले होते. अधीक्षक अभियंता, पाटबंधारे अन्वेषण मंडळ, नागपूर यांनी दि. २७/०९/२०१६ च्या पत्राने कार्यकारी अभियंता, उपसा सिंचन प्रकल्प विभाग, तिरोडा यांना तसे कळविले आहे.
(३) सन-२०१७ चे विधानसभेच्या पहिल्या अधिवेशनात मा.श्री.राजेश काशीवार, वि.स.स., यांनी उपस्थित केलेल्या अर्धा तास चर्चे मध्ये झालेल्या चर्चेदरम्यान मा.राज्यमंत्री यांनी दिलेल्या उत्तरात या विषयाबाबत एक स्वतंत्र बैठक घेवून विचार करू असे आश्वासन दिले होते.
(४) दि.०४/१२/२०१७ रोजी कार्यकारी संचालक, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर व आमदार श्री.राजेश काशीवार, वि.स.स. यांनी सदर योजनेसंदर्भात अधिकचा अभ्यास करण्याचे निर्देश दिले आहेत. त्याअनुषंगाने क्षेत्रिय स्तरावर कार्यवाही सुरू आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## उमरखेड (जि.यवतमाळ) तालुक्यातील उर्ध्व पैनगंगा प्रकल्प कार्यालय विभाग नं.५ उमरखेड येथे स्थलांतर करण्याबाबत

**(४२) १०२१०६ (०२-०१-२०१८). श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उमरखेड (जि.यवतमाळ) तालुक्यातील इसापूर धरणाच्या डाव्या कालव्याचे अपूर्ण काम तात्काळ पूर्ण होण्यासाठी उर्ध्व पैनगंगा प्रकल्प कार्यालय विभाग नं.५ हदगांव, जि.नांदेड येथून उमरखेड येथे स्थलांतरण करण्याबाबत माहे मार्च, २०१७ रोजीपासून स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा.जलसंपदा मंत्री यांना लेखी निवेदनाद्वारे विनंती केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या निवेदनानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२७-०२-२०१८) :** (१) होय.
(२) व (३) दिनांक १० जानेवारी, २०१८ च्या शासन निर्णयान्वये कार्यकारी अभियंता, उर्ध्व पेनगंगा प्रकल्प विभाग क्र.५, हदगांव या कार्यालयांतर्गत पुरेसा कार्यभार शिल्लक नसल्याने, हे विभागीय कार्यालय अंतर्गतच्या ५ उपविभागीय कार्यालयांसह बंद करण्यात आले होते. तथापि, प्रशासकीय कारणास्तव दिनांक ११ जानेवारी, २०१८ च्या शासन निर्णयान्वये सदर कार्यालय बंद करण्याच्या कार्यवाहीस पुढील आदेशापर्यंत स्थगिती देण्यात आली आहे.

---

**कळवण (जि.नाशिक) तालुक्यातील चणकापूर धरणावर सुरक्षाव्यवस्था करण्याबाबत**

**(४३) १०३७७९ (०३-०१-२०१८). डॉ.राहूल आहेर (चांदवड) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कळवण (जि.नाशिक) तालुक्यातील चणकापूर धरणावर सुरक्षाव्यवस्था नसल्यामुळे पर्यटक थेट मोटारसायकल घेऊन धरणातील पाण्यापर्यंत जात असल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार चणकापूर धरणावर सुरक्षाव्यवस्था करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२१-०२-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) चणकापूर धरणाचे सुरक्षेचे दृष्टीने धरणाकडे जाणा-या तीन मार्गावर ६ लोखंडी गेट्स बसविणेची कार्यवाही सुरु करणेत आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**खडकवासला कालव्यासाठी व दौंड (जि.पुणे) तालुक्यातील कोल्हापूरी पद्धतीच्या बंधाऱ्यांच्या दुरुस्तीसाठी निधी मिळण्याबाबत**

**(४४) १०३७९२ (०३-०१-२०१८). श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खडकवासला प्रकल्पातील नवीन मुठा कालवा, जुना कालवा (बेबी कॅनॉल) तसेच परिसरातील कोल्हापूरी पद्धतीच्या बंधाऱ्याच्या दुरुस्तीसाठी निधी मिळावा यासाठी दिनांक ०९ फेब्रुवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबतचा सविस्तर प्रस्ताव दिनांक ०३ ऑगस्ट,२०१६ रोजी शासनास सादर करण्यात आला असून मा.जलसंपदा मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली माहे ऑगष्ट, २०१६ व माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये बैठक घेण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,जुना कालवा किमी ८२ ते १०९ मधील नूतनीकरणाची ३ अंदाजपत्रके तयार करण्यात आली आहेत तसेच वितरिका क्र. २६ च्या दुरुस्तीची २ अंदाजपत्रके तयार करण्यात आली असून उक्त खर्चासाठी २ % खर्चाचे निकष असल्यामुळे मर्यादा येत आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार निधी वितरीत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२१-०२-२०१८) :** (१) होय
(२) होय
(३) होय
(४) सद्य:स्थितीत मा.राज्यपाल महोदयांच्या निर्देशानुसार विशेष दुरुस्ती/विस्तार व सुधारणा अंतर्गत एकूण वार्षिक अर्थसंकल्पीय तरतूदीच्या २ % च्या मर्यादेत निधी उपलब्ध होत असल्याने त्याच मर्यादेत राहून शासन स्तरावरुन विशेष दुरुस्ती/विस्तार व सुधारणा अंतर्गत प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहेत. सदर २% ची मर्यादा ५% पर्यंत शिथील करणेबाबतची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुरंदर उपसा सिंचन योजनेतील कुपटेवाडी फाटा येथे तांत्रिक अडचणीमुळे शेतकऱ्यांना पाणी मिळू शकत नसल्याबाबत**

**(४५) १०३८०२ (०३-०१-२०१८). श्री.राहूल कुल (दौंड), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दौंड तालुक्यातील डाळिंब, बोरीएदी, बोरीभडक, ताम्हाणवाडी, भरतगाव, यवत, कुपटेवाडी, लाटकरवस्ती, दोरगेवस्ती, मानकोबावाडा, भांडगाव, वाखारी या सर्व गावातील पाणीपुरवठा योजना ही पुरंदर उपसा सिंचन योजनेतील कुपटेवाडी फाटावर अवलंबून असून कुपटेवाडी फाटा येथील पाईप लाईनमध्ये मोठ्या प्रमाणावर असलेल्या तांत्रिक अडचणीमुळे या भागातील शेतकऱ्यांना शेतीसाठी व पाणीपुरवठ्यासाठी काही भागात पूर्ण दाबाने किंबहुना काही भागात पाणीच मिळू शकत नसल्याने या तांत्रिक अडचणी दुरुस्त करण्याबाबत लोकप्रतिनिधिंनी दिनांक १६ व २४ मार्च, २०१७ रोजी निवेदन दिले आहे तसेच दिनांक २४ ऑगस्ट, २०१६ व १३ ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्या सुमारास बैठक घेण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निवेदनानुसार कुपटेवाडी फाटा येथून उक्त गावांतील शेतकऱ्यांना शेती व पाणीपुरवठ्यासाठी पाणी देण्यासह तांत्रिक अडचणी दुरुस्त करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२१-०२-२०१८) :** (१) होय.
(२) दौंड तालुक्यातील पुरंदर उपसा सिंचन योजनेच्या लाभक्षेत्रासाठी कुपटेवाडी वितरिकेद्वारे पाणी पुरवठा करण्यात येतो. कुपटेवाडी वितरीकेच्या पाईपलाईनवरील व्हॉल्व दुरूस्ती व पाईप लिकेज या कामाच्या दुरूस्तीचे अंदाजपत्रकास तांत्रिक मान्यता देण्यात आलेली असून ही कामे करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चंद्रपूर आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये राबविण्यात आलेल्या चांदा ते बांदा या योजनेबाबत**

**(४६) १०३८३४ (०१-०१-२०१८). श्री.नारायण कुचे (बदनापूर) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये रिसोर्स बेस्ड इंटेसिव्ह प्लॅनिंग व डेव्हलपमेंट हा पथदर्शी कार्यक्रम चांदा ते बांदा या योजनेंतर्गत राबविण्यात येत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, चांदा ते बांदा योजनेतील पथदर्शी कार्यक्रम यशस्वी झाल्यानंतर या पॅटनप्रमाणे राज्यातील इतर जिल्ह्यांसाठी एकात्मिक आणि सर्वांगीण विकास करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या योजनेचे स्वरुप काय आहे व ही योजना पूर्ण करतांना त्याचा दर्जा उत्तम राहण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२०-०२-२०१८) :** (१) होय.
(२) होय.
(३) चंद्रपूर व सिंधुदुर्ग हे खनिज व नैसर्गिक संपत्तीचे वरदान लाभलेले जिल्हे आहेत. या जिल्ह्यातील नैसर्गिक साधनसंपत्तीचा इष्टतम वापर व्हावा यासाठी चंद्रपूर व सिंधुदुर्ग या जिल्ह्यामध्ये "रिसोर्स बेस्ड इंटेन्सीव्ह प्लॅनिंग व डेव्हलपमेंट" हा पथदर्शी कार्यक्रम राबविण्यासाठी "चांदा ते बांदा" ही योजना राबविण्यास मान्यता देण्यात आली आहे. हा कार्यक्रम प्रथमतः सन २०१६-१७ ते सन २०१९-२० या चार वर्षाच्या कालावधीसाठी राबविण्यास नियोजन विभाग, शासन निर्णय क्र.डीएपी-२०१५/प्र.क्र.५१/का.१४८१, दिनांक २९ जून, २०१६ अन्वये मान्यता देण्यात आली आहे.

"रिसोर्स बेस्ड इंटेन्सीव्ह प्लॅनिंग व डेव्हलपमेंट" वर आधारीत "चांदा ते बांदा" या कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणीसाठी पुढील विकास क्षेत्रांची निवड करण्यात येत आहे.

१) कृषि, फलोत्पादन व संलग्न सेवा २) पर्यटन ३) पशुधन विकास, दुग्ध व्यवसाय व मत्स्यव्यवसाय ४) उद्योग व खनिज तसेच संलग्न प्रक्रिया इत्यादि ५) वने, वनोत्पादन व पर्यावरण ६) जलसंधारण ७) ग्रामविकास, दारिद्र्य निर्मुलन व कौशल्य विकास

"रिसोर्स बेस्ड इंटेन्सीव्ह प्लॅनिंग व डेव्हलपमेंट" वर आधारित या पथदर्शी कार्यक्रमाची परिणामकता व फलनिष्पत्ती तपासण्यासाठी विविध प्रकारचे अध्ययन तसेच मुल्यमापन

करण्यात येणार आहे. सदर मुल्यमापन हे चांदा ते बांदा योजना सुरू असतांना (Concurrent Evaluation) तसेच कामे पुर्ण झाल्यावर (Impact Assessment) या स्वरूपात करण्यात येणार आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## माण (जि.सातारा) तालुक्यातील रांजणीपाटी ते पळशी व पळशी ते मार्डी या रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत

**(४७) ११४४५८ (०१-०३-२०१८). श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माण तालुक्यातील रांजणीपाटी ते पळशी व पळशी ते मार्डी (जि.सातारा) या मोठ्या प्रमाणात वर्दळ असणाऱ्या रस्त्यांची दुरवस्था झाली असून रस्त्यावर मोठया प्रमाणात खड्डे पडल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रस्त्याच्या दुरुस्तीकडे शासनाचे दुर्लक्ष झाले असल्यामुळे रस्त्यावर सातत्याने लहानमोठे अपघात घडत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रस्त्यांची शासनाने पाहणी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार उक्त रस्त्यांची तातडीने दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१७-०३-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) जिल्हा परिषदेमार्फत सदर रस्त्यांची पहाणी करण्यात आली आहे.

(४) सदर रस्त्यांच्या दुरुस्तीचे काम विविध योजनांतर्गत उपलब्ध होणाऱ्या निधीनुसार टप्प्या टप्प्याने करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## तळप बु.येथील अरुणावती नदीवरील पूलावर व शेलुबाजार (जि.वाशीम) येथील नाल्यावर संरक्षक कठडे बसविण्याबाबत

**(४८) ११५७८४ (०१-०३-२०१८). श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तळप बु. (ता.मानोरा, जि.वाशिम) ग्रामपंचायत अंतर्गत रामतीर्थ येथील अरुणावती नदीवरील पूलावर संरक्षक कठडे न बसविल्यामुळे अपघात घडून जिवित व वित्तहानी होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, शेलुबाजार (ता.मंगरुळपीर, जि.वाशीम) येथील मुख्य चौकात असलेल्या नाल्यावरही संरक्षक कठडे नसल्यामुळे अपघात होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या दोन्ही प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, त्यानुसार अरुणावती नदीवरील पुलावर व शेलुबाजार येथील नाल्यावर तातडीने संरक्षक कठडे बसविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१७-०३-२०१८) :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) प्रश्नांकित स्थळाची जिल्हा परिषदेमार्फत पाहणी करण्यात आली आहे.
(४) अ) अरुणावती नदीवरील पूल रामतीर्थ पोचमार्ग ग्रामीण मार्ग ५० वर आहे. सदर पूलावर कठडे बसविण्यात आले होते. तथापि, सद्यस्थितीमध्ये ते मोडकळीस आले असल्यामुळे कठडे बसविण्याचे काम रस्ते व पूल परिरक्षण व दुरुस्ती कार्यक्रम गट ड सन २०१७-१८ मध्ये प्रस्तावित करण्यात आले आहे.

ब) शेलू बाजार (ता.मंगरुळपीर) येथील मुख्य चौकातील नाला नागपूर-कारंजा-शेलू-मेहकर प्र.रा.मा.क्र.१२ आणि अकोला-शेलू-मंगरुळपीर-दिग्रस रस्ता रा.मा.२७३ यांचे संगमस्थळावर आहे. या रस्त्यावर स्लॅब ड्रेन आहे. सदरचा रस्ता सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारित असून तेथील स्लॅब ड्रेन वर संरक्षक कठडे बसविण्याचे काम सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत सुरु करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## धनज बु (जि.वाशिम) गावाजवळील भिवरी रस्त्यावरील पूल वाहून गेल्याबाबत

**(४९) ११५७९२ (०१-०३-२०१८). श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धनज बु (जि.वाशिम) गावाजवळील भिवरी रस्त्यावरील पूल दिनांक १५ जून, २०१७ रोजी वां त्यासुमारास झालेल्या पहिल्या पावसात वाहून गेला असल्यामुळे वाहतूक बंद होऊन ग्रामस्थांची गैरसोय होत असल्याचे तसेच या गावातील संरपंचानी नवीन पूल उभारण्याबाबत संबंधित विभागाला निवेदन दिले असतानाही कोणतीही कार्यवाही करण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) तसेच या रस्त्यावरील अंबोडा रस्त्यालगत हिंदू स्मशानभूमी जवळच्या पूलाची उंची कमी असल्यामुळे पूल पावसाळयात धोकादायक ठरत असतो, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीनुसार उपरोक्त दोन्ही ठिकाणी नवीन पूल बांधण्याबाबत तसेच याकडे दुर्लक्ष करणाऱ्या अधिका-यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१७-०३-२०१८) :** (१) हे खरे नाही. धनज ते भिवरी ग्रामीण मार्ग क्र.२१ या रस्त्यावरील धनज गावाजवळील कि.मी. ०/२०० मधील अस्तित्वातील डबर बांधकामाच्या रपट्याचे डाउनस्ट्रिमची भिंत १५ जून, २०१७ च्या पावसाळ्या दरम्यान क्षतीग्रस्त झाली आहे. अतिवृष्टीचा कालावधी वगळता सद्यस्थितीत रपट्ट्याचे ठिकाणावरुन रस्त्यावरील वाहतूक सुरळीत सुरु आहे.

सदर रस्ता व त्यावरील दोन लहान पुल यांच्या बांधकामास मुख्यमंत्री ग्रामसडक योजने अंतर्गत प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) जिल्हा परिषदेमार्फत प्रश्नांकित रपट्ट्यांची पहाणी करण्यात आली आहे.

(४) वरील प्रमाणे धनज ते भिवरी या ग्रामीण मार्ग क्र.२१ वरील दोन लहान पुलांच्या बांधकामास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

तसेच धनज ते अंबोडा या ग्रामीण मार्ग क्र.१९ वरील सा.क्र. ०/६०० व सा.क्र. १/०० वरील रपट्ट्यावरुन पावसाळ्यात पाणी वाहत असल्याने वाहतूकीस अडथळा निर्माण होतो. या ठिकाणी लहान पुलांची कामे जिल्हा परिषदेला प्राप्त निधी व निकषास अधिन राहून प्रस्तावित करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कारेखडा-यशवंतनगर (ता.मानोरा, जि.वाशिम) येथील पुलाची दुरुस्ती करण्याबाबत

**(५०) ११५७९३ (०१-०३-२०१८). श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कारेखडा-यशवंतनगर (ता.मानोरा, जि.वाशिम) येथे दोन महिन्यापूर्वी बांधण्यात आलेल्या पुलाचे काम निकृष्ट दर्जाचे केल्यामुळे सदर पूल खचला असल्याचे दिनांक २३ जून, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पूल खचल्यामुळे या पूलालगतच्या शेतात पावसाचे पाणी जाऊन नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार सदर पूलाची तातडीने दुरुस्ती करण्याबाबत व या पूलाचे निकृष्ट दर्जाचे बांधकाम करणा-या ठेकेदारावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१५-०३-२०१८) :** (१) हे खरे नाही, पूल खचलेला नसून. अतिवृष्टीमुळे पाईप कल्वर्टचे मुरमी अस्तर व पोच मार्गावरील मुरुम खरडून गेला होता. तसेच डाऊन स्ट्रीमच्या फेसवॉलला केशिका चीर (हेअर क्रॅक) गेली होती.

(२) हे खरे नाही.
(३) जिल्हा परिषदेमार्फत पाहणी करण्यात आली आहे.
(४) दोषदायित्व कालावधीमध्ये कंत्राटदाराकडून कामाची तात्काळ दुरुस्ती करुन घेण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.